दिनांक :     .८.२०१९

**प्रति,**
**मा. पंतप्रधान,**
**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० आणि ३५-अ हटवल्याप्रकरणी केंद्र सरकारचे अभिनंदन आणि काश्मिरी हिंदूंचे पुनर्वसन करणे यांविषयी .....**

महोदय,

केंद्रातील भाजप सरकारने ५ ऑगस्ट २०१९ या दिवशी जम्मू-काश्मीरमधील 'कलम ३७०' आणि '३५-अ' हटवून एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. काँग्रेसने ७० वर्षांपूर्वी केलेले पाप मोदी सरकारने धुवून काढले आहे. याबद्दल हिंदु जनजागृती समिती सर्व हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने केंद्र सरकारचे अभिनंदन करते.

कलम ३७० रहित करावे, ही मागणी देशभक्त नागरिक आणि विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी अनेक स्तरांवर लावून धरली होती. या मागणीला न्याय मिळाला. हिंदु जनजागृती समिती आणि सनातन संस्था यांनी जाहीर सभा अन् अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशन यांमधून कलम ३७० हटवण्याविषयी आवाज उठवला होता. **या निमित्ताने आम्ही या निवेदनाच्या माध्यमातून जम्मू-काश्मीर आणि काश्मिरी हिंदु यांच्याविषयी काही मागण्या करत आहोत......**

१. कलम ३७० हटवून भारतमातेच्या मस्तकावरील भार हलका केला आहे, तसेच आता विस्थापित काश्मिरी हिंदूंचे काश्मीर खोऱ्यात पुनर्वसन करून सुवर्ण मुकुट चढवावा.

२. सरकारने काश्मीरमध्ये उद्ध्वस्त करण्यात आलेल्या मंदिरांची पुनर्स्थापना करावी.

३. गेल्या ७० वर्षांत जम्मू-काश्मीर विधानसभेने केलेले देशविरोधी कायदे रहित करावेत

४. रोहिंग्या मुसलमानांना दिलेला आश्रय रहित करून त्यांची तात्काळ देशाबाहेर हकालपट्टी करावी.

हिंदूंच्या या मागण्यांवर केंद्र शासन निश्चितच कारवाई करेल, अशी आम्हाला खात्री आहे. याविषयी केंद्र सरकार जी पावले उचलेल, त्याविषयी आम्हांला अवगत करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

संपर्क :